# भाजपाची त्सुनामी; अर्जुनास्त्र निष्फळ

शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १४१ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886




https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

### जालना मनपा निवडणूक; भाजपा ४१, शिवसेना १३, काँग्रेस ९ एमआयएम २

# गोरंट्याल ‘बाजीगर’; दानवे ठरले ‘चाणक्य’

**जालना । प्रतिनिधी-** माजी आमदार कैलास गोरंट्लया आणि आमदार अर्जुनराव खोतकर यांनी प्रतिष्ठेच्या केलेल्या जालना महानगर पालिकेच्या निवडणुकीत भाजपाची त्सुनामी आली असून ६५ जागांपैकी ४१ जागांवर विजय मिळवून जालना शहर महानगर पालिकेवर एकहाती सत्ता मिळविली आहे. आजी - माजी आमदारांनी प्रभाग ९ मधील लढत अत्यंत प्रतिष्ठेची केली. यात कैलास गोरंट्याल यांनी बाजी मारली असून भाजपाने प्रभागातील चारही जागांवर विजय मिळविला आहे. या ठिकाणी शिवसेनेचे शहर प्रमुख तसेच महापौर पदाचे उमेदवार विष्णू पाचफुले यांच्या संपूर्ण पॅनलचा दारूण पराभव झाला आहे.

भाजपाकडून या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावन्नकुळे, माजी राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी प्रचाराची धुरा आपल्या खांद्यावर घेतली होती. ४० पेक्षा अधिक जागा भाजपाच्या निवडून येण्याचा दावा रावसाहेब दानवे करत होते आणि त्यांच्या दाव्यात ‘दम’ असल्याचे आजच्या निकालाने स्पष्ट झाले आहे.

शिवसेनेकडून लाडकी बहिण आणि पीआरकार्डचा मुद्दा पुढे केला गेला होता. मात्र, आ. खोतकर यांच्या शिवसेनेला लाडक्या बहिणींनी स्पष्टपणे नाकारल्याचे चित्र निकालाअंती दिसून येत आहे. भाजप-शिवसेना युती माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यामुळे तुटल्याचा आरोप आमदार खोतकर यांनी वेळोवेळी प्रचारात केला. आता म ाजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यामुळे भाजपाने युती तोडली असेल तर खऱ्या अर्थाने ते भाजपाच्या विजयाचे बाजीगर ठरले. तर भास्कर दानवे यांनी आपल्या चाणक्यनितीची झलक या निवडणुकीत दाखवून दिली.

जालना शहर महानगर पालिकेच्या ६५ जागांवर झालेल्या निवडणुकीत भाजपाने ४१ जागांवर, पुरस्कृत एक अपक्षासह शिवसेना (एकनाथ शिंदे) १३, कॉग्रेस ९, एमआयएम २, जागांवर विजय मिळविला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार), राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), वंचित बहुजन आघाडी, शिवसेना (उद्धव ठाकरे) या पक्षाला एकही जागा मिळाली नाही. **पान ४ वर**




## निकालानंतर प्रभाग १० मधील दोन गटात लाठ्या-काठ्यांनी मारहाण, १० ते १५ जखमी

### जुना जालना भागातील मिलन चौक येथे ही घटना घडली

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर शहरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. निकाल जाहीर झाल्यानंतर दोन राजकीय गटांच्या समर्थकांमध्ये लाठ्या-काठ्यांनी जोरदार मारहाण झाल्याची घटना घडली. या घटनेत तब्बल १० ते १५ जण जखमी झाल्याची माहिती आहे.

काँग्रेसचे सय्यद रहीम आणि शिवसेनेचे शेख जावेद यांच्या समर्थकांमध्ये हा राडा झाला. सुरुवातीला वादाला तोंड फुटल्यानंतर काही वेळातच हाणामारीचे रूपांतर मोठ्या संघर्षात झाले. लाठ्या-काठ्यांसह दगडफ ेकही करण्यात आली.

या मारहाणीत चार ते पाच जणांचे डोके फुटले असून, एक ते दोन जणांच्या हातावर धारदार शस्त्रांनी वार करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दोन्ही गटांतील जखमींना तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तर एकाला सामान्य रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी खाजगी रुग्णालयात पाठवण्यात आले. यावेळी परिसरातील दोन्ही कडच्या मोठा जमाव जमला होता.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून परिसरात तणावपूर्ण शांतता आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.





# जालन्यात भाजपाचा निर्विवाद विजय; महानगरपालिकेनंतर थेट जिल्हा परिषदेवर सत्ता स्थापनेचा निर्धार - आमदार बबनराव लोणीकर

**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ४१ जागांवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करत शहराच्या राजकारणात आपली ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. हा विजय केवळ महानगरपालिकेपुरता मर्यादित नसून, आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी भाजपाने उभारलेला भक्कम राजकीय पाया आहे, असे आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

विजयानंतर आयोजित कार्यकर्ता संवाद कार्यक्रमात बोलताना लोणीकर म्हणाले की, हा विजय कोणत्याही एका नेत्याचा नाही, तर संघटनेचा आहे. बूथ पातळीवर आखलेली रणनीती, प्रत्येक कार्यकर्त्याने दिलेली झुंज आणि नेतृत्वाने दिलेली दिशा - या तिन्हींच्या जोरावरच हा निकाल लागला आहे. महानगरपालिका निवडणुकीत भाजपाचा विजय हा बूथ पातळीवरील नियोजनाचा भाग आहे. मतदार याद्यांची बारकाईने तपासणी, प्रत्येक मतदारापर्यंत थेट पोहोचण्याची योजना, घराघरात संवाद, प्रचारातील शिस्त आणि मतदान दिवशीची अचूक यंत्रणा - या प्रत्येक टप्प्यावर कार्यकर्त्यांनी नियोजनबद्ध काम केले असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.


कार्यकर्त्यांनी जीवाची बाजी लावली, वेळेची आणि श्रमांची कोणतीही तडजोड केली नाही, त्यामुळेच भाजपाला प्रत्येक प्रभागात निर्णायक आघाडी मिळाली. या विजयामागे राज्य पातळीवरील नेतृत्वाचे देखील ठोस पाठबळ असल्याचे लोणीकर यांनी अधोरेखित केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संघटन मजबूत करण्यासाठी दिलेले मार्गदर्शन, सातत्याने ठेवलेला संपर्क आणि कार्यकर्त्यांमध्ये निर्माण केलेला आत्मविश्वास यामुळे संपूर्ण यंत्रणा एकसंघपणे काम करू शकली, असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी सांगितले.

जिल्ह्यातील भाजपाच्या नेतृत्वातील एकजूट अधोरेखित करत लोणीकर म्हणाले, रावसाहेब दानवे आणि माझी जोडी ही जय-वीरूसारखी आहे. दानवे-लोणीकर-गोरंट्याल आणि आम्ही सर्वजण एकत्र, ताकदीने आणि स्पष्ट राजकीय भूमिकेसह काम करत आहोत. पण या सगळ्या नेतृत्वाला खरी ताकद देणारा घटक म्हणजे आमचा कार्यकर्ता आहे. या कार्यकर्त्यांच्या कार्य कुशलतेच्या बळावरच

आज आपण भारतीय जनता पक्षाचा महापौर जालना महानगरपालिकेमध्ये बसवतो आहोत. महानगरपालिकेतील सत्तास्थापनेबाबत बोलताना लोणीकर यांनी स्पष्ट केले की,

महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष आणि सर्व सभापती हे भारतीय जनता पक्षाचेच असतील. ही सत्ता जनतेच्या विकासासाठी आणि कार्यकर्त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी वापरली जाईल. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीबाबत आक्रमक राजकीय भूमिका मांडताना ते म्हणाले, जालना महानगरपालिका हा विजय म्हणजे फक्त सुरुवात आहे. जालना मनपा ही झाकी आहे, अजून जिल्हा परिषद बाकी आहे. आता लक्ष्य स्पष्ट आहे - जिल्हा परिषदेत ५० जागा निवडून आणायच्या आणि तिथेही भाजपाचाच झेंडा फडकवायचा आहे. कार्यकर्त्यांना थेट संदेश देताना आमदार लोणीकर म्हणाले की, पुढची लढाई आणखी मोठी आहे. कार्यकर्त्यांनी मोठ्या निर्धाराने भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे. बूथ मजबूत असेल, तर कोणतीही राजकीय ताकद आपल्याला रोखू शकत नाही. जालना महानगरपालिकेतील हा निर्विवाद विजय म्हणजे भाजपाच्या संघटनात्मक ताकदीचा, कार्यकर्त्यांच्या मेहनतीचा आणि नेतृत्वाच्या स्पष्ट राजकीय दिशेचा परिणाम असून, याच बळावर आगामी जिल्हा परिषद निवडणुकीतही भाजपाचा विजय निश्चित आहे, असा ठाम विश्वास या कार्यक्रमात आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.
























**जालना महानगर पालिका निवडणुकीच्या निकालानंतर विजयी उमेदवारांनी जल्लोष केला. पोलीसांनी तगडा बंदोबस्त ठेवला होता.**


भारतीय जनता पार्टी चे अधिकृत उमेदवार
प्रभाग क्र. 01
अ विजयी श्री.भद्नेकर कल्याण जगदीश
ब विजयी सौ.ज्योती रवि सले
क विजयी सौ.दानवे सुशीला भास्करराव
ड विजयी सौ.पद्मा अजित मानधानी
इ विजयी श्री.दानवे भास्करराव मुकुंदराव
प्रभाग क्र. 02
अ विजयी सौ.साळवे श्ध्दा दिपक (बापु)
ब हरले सौ.शारदा किशनराव नाईकवाडे
क हरले श्री.भवर बाबुराव शंकर
ड विजयी मजहर समद सय्यद
प्रभाग क्र. 03
अ विजयी श्री.ॲड.भगवान मारोती चांदोडे
ब विजयी सौ.आडेकर ऐश्वर्या अशोक
क विजयी श्री.भुरेवाल कपिल श्रावण
ड विजयी सौ.पुनम राजेश स्वामी
प्रभाग क्र. 04
अ विजयी सौ.कुरील रूपा संजय
ब हरले श्री.जल्लेवार तुषार गणेश
क विजयी सौ.सकुबाई गुलाब पनबिसरे
ड विजयी श्री.संजय प्रभाकर पाखरे
प्रभाग क्र. 05
अ विजयी श्री.गोरंट्याल अक्षय कैलास
ब विजयी सौ.अनिता मोहन खोडवे
क विजयी सौ.माया मनोजकुमार जोशी
ड विजयी श्री.अजय (जगदीश) भरतिया
प्रभाग क्र. 06
अ विजयी सौ.गोरंट्याल संगीता कैलास
ब विजयी सौ.प्रियंका रोहित भूरेवाल
क विजयी श्री.वीरेंद्रकुमार अमरचंद धोका
ड विजयी श्री.संतोष गंगाराम माधोवाले
प्रभाग क्र. 07
अ हरले श्री.सुनील रूपा खरे
ब विजयी सौ.पार्वतीबाई महादेव देशमाने
क विजयी सौ.स्नेहलता विजय कामड
ड विजयी श्री.राऊत राजेश रामभाऊ
प्रभाग क्र. 08
अ हरले सौ.रेणुका विनोद शिनगारे
ब विजयी सौ.वर्षा वैजिनाथ राऊत
क विजयी श्री.गौरक्षक रमेश ब्रिजलाल
ड हरले श्री.संजय गुलाबचंद भगत
प्रभाग क्र. 09
अ विजयी सौ.गरदास मंगल नंदकिशोर
ब विजयी सौ.देठे संध्या संजय
क विजयी श्री.महावीर रामकुमार ढक्का
ड विजयी श्री.विक्रांत महावीर ढक्का
प्रभाग क्र. 10
अ हरले श्री.पवार विजय बाबुराव
ब हरले सौ.पवार रूखमनी सुभाष
क विजयी सौ.इंगळे कार्तिका मनोज
ड हरले श्री.शेख नईम शे.मोहम्मद
प्रभाग क्र. 11
अ हरले श्री.शेख अजीज जमील मणियार
ब हरले सौ.लाड कान्होपात्रा गजानन
क हरले हिना फिरदोस एमडी मोहसीन
ड हरले ठाकुर धरमसिंग रणजितसिंग
प्रभाग क्र. 12
अ हरले श्री.अनभोरे कपिल नाजुकराव
ब हरले कु.गायकवाड साक्षी सोमनाथ
क हरले सौ.जाधव स्वाती सतीश
ड हरले श्री.जगन्नाथ कारभारी चव्हाण
प्रभाग क्र. 13
अ विजयी सौ.भाग्यश्री सुजितकुमार जोगस
ब विजयी सौ.अनामिका विजय पांगारकर
क विजयी श्री.महेश विष्णु निकम
ड हरले श्री.ढोबळे ज्ञानेश्वर रावसाहेब
प्रभाग क्र. 14
अ विजयी सौ.ॲड.रिमा संदिप खरात (काळे)
ब विजयी श्री.अशोक (लक्ष्मीकांत) मनोहर पांगारकर
क विजयी सौ.गोर्डे सुलोचना लक्ष्मण
ड विजयी श्री.घुगे शशिकांत रामकृष्ण
प्रभाग क्र. 15
अ विजयी श्रीमती वंदना अरूण मगरे
ब विजयी श्री.पवार अशोक मगनराव
क हरले श्रीमती अनिता दाविद बिडकर
ड हरले सौ.अरूणा शिवराज जाधव
प्रभाग क्र. 16
अ हरले श्री.विनोद विठ्ठलराव रत्नपारखे
ब हरले सौ.कल्याणी बाबू पवार
क हरले सौ.टेकाळे सुचिता सचिन
ड हरले श्री.आदित्य नारायण बोराडे


शिवसेनेचे विजयी शिलेदार ...
निखील पगारे
उषाताई पांगारकर
दर्शना झोल
अमोल ठाकूर
पुजा दिनेश भगत
दुर्गेश काठोठीवाले
कमलेश खरे
पुजा योगेश भगत
दीपक राठोड
अब्दुल सगीर
संजय डुकरे पाटील
सौ. सत्यभामा जाधव

# गोरंट्याल 'बाजीगर'; दानवे ठरले 'चाणक्य'







पान १ वरुन

प्रभाग निहाय विजयी उमेदवार पुढील प्रमाणे

प्रभाग क्र. १
भाजपाचे संपूर्ण पाचही जागांवर विजय; भास्कर आबा दानवे, कल्याण भदनेकर, सौ.सुशीला दानवे, सौ.पद्मा मानधानी, सौ. ज्योती सले.

प्रभाग क्र.२
दोन भाजपा;
श्रद्धा दीपक साळवे, मजहर समद सय्यद
दोन शिवसेना; पूजा योगेश भगत, दीपक राठोड

प्रभाग क्र. ३
चारही भाजपा; भगवान मारुती चांदोळे, सौ ऐश्वर्या अशोक आडेकर, कपिल श्रावण भुरेवाल, सौ पूनम राज स्वामी

प्रभाग क्र. ४
तीन भाजपा; सौ.रूपा संजय कुरील, सखूबाई पानबिसरे, संजय पाखरे, एक काँग्रेस फारुख सादिक तुंडीवाले.

प्रभाग क्र. ५
चारही भाजपा; अक्षय कैलास गोरंट्याल, अनिता मोहन खोडवे, सौ माया मनोज जोशी, अजय (जगदीश) भरतीया.

प्रभाग क्र. ६
चारही भाजपा; संगिता कैलास गोरंट्याल, विरेंद्रप्रकाश धोका, प्रियंका रोहित भुरेवाल, संतोष माधोवाले,

प्रभाग क्र. ७
एक शिवसेना; कमलेश खरे.
तीन भाजपा; राजेश राऊत, सौ.पार्वताबाई देशमाने, सौ. स्नेहलता विजय कामड,

प्रभाग क्र.८
दोन शिवसेना; पूजा दिनेश भगत, दुर्गेश काठोठीवाले
दोन भाजपा; वर्षा वैजनाथ राऊत, रमेश गौरक्षक

प्रभाग क्र.९
चार भाजपा; सौ.मंगल गरदास, सौ.संध्या संजय देठे, महावीर रामकुमार ढक्का, विक्रांत महावीर ढक्का

प्रभाग क्र. १०
तीन काँग्रेस; आसिफ अन्सारी, फरहाना अन्सारी, अमजद खान
एक भाजपा; कार्तिका मनोज इंगळे,

प्रभाग क्र.११
एक काँग्रेस इम्रान खान अमानुल्ला खान,
दोन एमआयएम नगमा खान, सायरा फखरुल्ला
एक शिवसेना अब्दुल सगीर अजीज शेख

प्रभाग क्र.१२
चार काँग्रेस; सुनील अशोक बोर्डे, सौ मयुरी दिनेश दैने, रुबीना मजीद पठाण, अनिल अशोक तिरुके,

प्रभाग क्र.१३
तीन भाजपा; भाग्यश्री सुजित जोगस, सौ.अनामिका विजय पांगारकर, महेश विष्णू निकम, एक अपक्ष श्रीकांत पांगरकर.

प्रभाग क्र.१४
चार भाजपा; ॲड.रिमा संदीप खरात, अशोक पांगारकर, सौ सुलोचना लक्ष्मण गोर्डे, शशिकांत घुगे.

प्रभाग क्र.१५
दोन भाजपा; वंदना अरुण मगरे, अशोक पवार
दोन शिवसेना; सत्यभामा विजय जाधव, संजय डुकरे.

प्रभाग क्र.१६
चार शिवसेना निखिल पगारे, उषाताई पांगारकर, दर्शना झोल, अमोल ठाकूर.

गेल्या पंधरा दिवसांपासून शहरातील वातावरण पूर्णपणे राजकीय झाले होते. भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, महाविकास आघाडी, एमआयएम, वंचित बहुजन आघाडी यांच्यासह अपक्ष उमेदवारांनी प्रचाराची धूम उडवली होती. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत प्रभागनिहाय बैठका, रोड शो, पदयात्रा, सभा, सोशल मीडियावर प्रचार यामुळे शहरात राजकीय तापमान चांगलेच वाढले होते.

**चार वर्षांनंतर मिळणार पहिला महापौर** जालना शहराला तब्बल चार वर्षांनंतर आणि महानगर पालिका झाल्यानंतर पहिला भाजपाचा महापौर मिळणार आहे. त्यामुळे नव्या महापौराकडून नागरिकांना मोठ्या अपेक्षा आहेत. महापौर पदासाठी आरक्षण अद्याप जाहीर झालेले नसले तरी पुढील चार ते पाच दिवसांत आरक्षण जाहीर होण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर महापौरपदाच्या शर्यतीला खऱ्या अर्थाने सुरुवात होणार आहे. सध्या भास्कर दानवे, संगीताताई गोरंट्याल यांची नावे विशेष करुन महापौर पदासाठी आघाडीवर आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.